नियमित दिवाणी दावा क्र.१३६/२०२० नि.१६ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ३९, नियम १ (अ) अन्वये तुर्तातुर्त ताकीद मिळण्याकरीता दाखल करण्यात आला आहे.

दावा मिळकत

२. गट नंबर ३७४६ ब क्षेत्र १ हेक्टर ८० आर. त्याच्या पूर्वेस व दक्षीणेस ३७४७, पश्चिमेस ३७४५ व उत्तरेस रस्ता. या जमिनीमधून आटपाडी–भिवघाट रस्ता जातो. यामुळे सदर जमिनीचे दोन भाग झालेले आहेत. त्यापैकी पश्चिम भागातील दक्षीण अंगाची जमीन ३ आणे पावणेतीन पै. हिश्श्याचे म्हणजे ३६.३२ आर क्षेत्रफळाची मिळकत याला दावा मिळकत म्हणून संबोधण्यात आले आहे.

वादीची बाजू

३. गट क्रमांक ३७४६ या मिळकतीपैकी निरनिराळे क्षेत्र वादी प्रतिवादी यांनी खरेदी केले आहे. भिवघाट–आटपाडी रस्त्याच्या पश्चिमेची दक्षीण अंगाची ३ आणे पावणेतीन पै चा हिस्सा वादी यांच्या मालकीचा आहे. ती स्वतंत्र करुन मिळावा म्हणून वादीने दावा दाखल केला आहे. मात्र प्रतिवादी ३ ते ५ यांचे क्षेत्र वादीच्या जागेच्या पश्चिमेस आहे आणि त्याठिकाणी प्रतिवादींचा पेट्रोलपंप आहे. वादी त्या क्षेत्राचा वापर प्रतिवादीने रस्ता म्हणून करण्यास सुरवात केली. मात्र यामधून वाद होवून प्रतिवादी ३ ते ५ यांनी वादी यांच्यावर खोटा खटला दाखल केला. वादीच्या मते प्रतिवादी यांच्या पेट्रोलपंपाला उत्तरेकडे असणा–या निंबवडे रस्त्याकडून रस्ता आहे. त्यांना पूर्वेकडून रस्ता नाही. प्रतिवादी यांनी वादीच्या जागेत अतिक्रमण करण्याच्या हेतूने दावा जागेतील पेट्रोलपंपाच्या पुढे पत्राशेडचे शॉपींग सेंटर बांधण्यास सुरु केले. सदर सेंटरमधील गाळे पूर्वाभिमुख आहेत.

प्रतिवादींनी सदर पत्राशेडचे काम कोणतीही परवानगी न घेता केले आहे. सदरचे बांधकाम वादीच्या हिश्श्यामध्ये येते. त्यामुळे वादविवादात वाढ होवून ति–हाईत इसमांचे अधिकार त्या जागेमध्ये निर्माण होवू शकतात आणि तसे झाल्यास वादीचे अपरीमित नुकसान होवू शकते. म्हणून प्रस्तुतच्या अर्जान्वये प्रतिवादी ३ ते ५ यांनी भिवघाट रस्त्याच्या पश्चिम दक्षीण अंगाच्या जागेत कोणताही बदल होवू नये किंवा शॉपीग सेंटर तयार होईल व त्याअन्वये ति–हाईत व्यक्तीचे हक्क निर्माण होतील असे कोणतेही कृत्य करु नये अशी मागणी केली आहे.

प्रतिवादी ३ ते ५ यांची बाजू

४. या अर्जाला प्रतिवादी क्र. ३ यांनी नि. ४३ येथे आपले म्हणणे सादर केलेले आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी पुरसीस सादर करुन प्रतिवादी क्र. ३ यांनी दिलेले म्हणणे स्वीकृत केलेले आहे. सदर म्हणण्याचे अवलोकन केले असता सदर प्रतिवादी यांनी अत्यंत विस्तृतपणे आपले म्हणणे सादर करुन दाव्यातील मजकुरासंदर्भात देखील कथन या म्हणण्यामध्ये समाविष्ट केले आहे.

५. प्रतिवादी ३ ते ५ यांनी वादीच्या संपूर्ण अर्जाचे व दाव्याचे खंडन केले आहे. त्यांनी दावा मिळकत आणि त्याचा मूळ गट यासंदर्भात त्यांच्या अनुषंगाने आवश्यक असणारा इतिहास नमूद केला आहे. त्यांची पेट्रोलपंप आणि इतर मिळकत ही आटपाडी भिवघाट रस्त्याला लागून असून ती वादीचे पूर्वहक्कदार यांनी त्यांना खरेदी दिली होती. त्या वेळेपासून सुमारे ४० ते ४५ वर्षापूर्वी त्यांनी सदर मिळकत अकृषीक करुन घेतली आहे. वादी जी काही दावा मिळकत म्हणून जागा दर्शवितो ती कधीही वादी यांची नव्हती. त्याचप्रमाणे दावा मिळकतीच्या मूळ गटांमध्ये विविध सहहिस्सेदार यांनी बांधकाम केले आहे. वादी यांनी प्रतिवादी यांची मिळकत त्यांची आहे असा बनाव करुन २०१३ साली खोटे खरेदीखत केले आहे.

६. प्रतिवादी पुढे नमूद करतात की त्यांचा पेट्रोलपंप पूर्वाभिमुख असून त्याला लागून भिवघाट आटपाडी बायपास आटपाडी रस्त्यपर्यंत संपूर्ण मिळकत

त्याची आहे. ती जागा अकृषीक करण्यात आली आहे. त्यांनी हल्लीच पेट्रोलपंपाचे नुतणीकरण करण्याचे काम सुरु केले आहे. वादी म्हणतो त्याप्रमाणे पेट्रोलपंपाच्या उत्तरेस कधीही रस्ता नव्हता. प्रतिवादी ३ ते ५ यांचे पूर्वहक्कदार यांनी दावा गट क्र. ३७४६ च्या पश्चिमेकडील गटक्रमांक ३७४७ वगैरे मिळकती लागून खरेदी केल्या आहेत. त्यामध्ये राहती घरे व गाळे आहेत. त्यामुळे प्रतिवादी त्या जागेचे मालक आहेत. थोडक्यात वादी दाद मागत असणारी जागा ही त्यांच्याशी संबंधीत नाही असे प्रतिवादीचे म्हणणे आहे.

७. त्यांनी पुढे कथन करुन वादीने या न्यायालयात नियमित दिवाणी मुकादमा नं. १७/२०१० दाखल केला होता. सदरचा दावा वादींनी मुद्दामहून चालविला नाही आणि दि. २९. ९. २०१५ रोजी तो बिनशर्त काढून घेतला. त्या दाव्यात देखील वादीने वाटपाची मागणी केली होती. त्यात ताकीद अर्ज दिला होता. मात्र वादीला अपयश येणार याची खात्री झाल्यावर त्यांनी तो दावा काढून घेतला. वादीने सदर दाव्याबाबतची वस्तुस्थीती प्रस्तुतच्या दाव्यात कथन न केल्यामुळे वादी स्वच्छ हाताने दाव्यात आला नाही असे प्रतिवादीचे म्हणणे आहे. वादी हा न्यायालयाची दिशाभूल करुन पूर्वी मागितलेल्या दाव्यातील मागणीप्रमाणे या दाव्यात केवळ शब्दांचा फेरफार करुन पुन्हा तीच मागणी मागत असल्याचे त्यांनी कथन केले आहे. वादीस तशी मागणी मिळण्याचा कोणताही अधिकार नाही अशी मागणी प्रतिवादी यांनी केली आहे.

८. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे ज्याअर्थी वादी यांनी सन २०१३ साली या दाव्यातील विषय असलेली मिळकत विक्री घेतल्याचे कथन केले आहे त्याअर्थी पुर्वीच्या दाव्यामध्ये त्याबाबत कोणताही उहापोह जाणूनबूजन केला नसल्याची बाब प्रतिवादींनी अधोरेखीत केली आहे. सबब वादी हा लबाडीने पुन्हा एकदा पूर्वी मागितलेल्या दादी मागत आहे असे कथन प्रतिवादी यांनी पुन्हा केले आहे.

९. प्रतिवादी यांनी पुढे असे नमूद केले की मुळात वादी याला ० हे.– ३६.३२ आर या मिळकतीची मालकी कशी आली याबाबतचा कोणताही उल्लेख त्यांनी दाव्यात केलेला नाही. त्याचप्रमाणे विविध खरेदीखत केव्हा करण्यात आले

व त्यानंतर किती क्षेत्र शिल्लक राहिले याबाबत देखील कोणताही उल्लेख वादीने जाणूनबुजून केलेला नाही असे कथन प्रतिवादीने केले आहे.

१०. अशा परिस्थीतीमध्ये प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले की प्रतिवादी ३ चे वडील रामराव सातारकर यांनी दावा मिळकतीलमधील ७ आणे सव्वातीन पै चा हिस्सा चार वेगवेगळया खरेदीखताने घेतला. त्यापैकी एक खरेदीखत २५. ५. १९८१ रोजी केले असून त्याअन्वये ३ आणे ६ पै चा हिस्सा खरेदी करण्यात आला. त्यामध्ये सदर गट क्रमांक ३७४६ च्या पश्चिम बाजूचा हिस्सा खरेदी करण्यात आला. दि. १०. ४. ८४ रोजी सदर गटातील २ आणे २ पै चा हिस्सा खरेदी करण्यात आला. त्यावेळेस आटपाडी दिघंची बायपास रस्त्यालगत पूर्वी दिलेल्या मिळकतींना लागूनच क्षेत्र खरेदी देण्यात आले. तद्नंतर २३. १२. १९८५ रोजी वादीचे चुलते यांच्याकडून साडेदहा पै चा हिस्सा शंकर बाबा मंडले यांच्याकडून त्यांच्या हिश्श्याला लागून दक्षीण बाजूने पूर्वपश्चिम हिस्सा खरेदी करण्यात अला. तर १८.१.१९८९ रोजी पुन्हा शंकर मंडले याच्याकडून रामराव सातारकर यांनी पावणेनउ पै चा हिस्सा विकत घेतला. त्यामध्ये पूर्वेस आटपाडी भिवघाट रस्ता असे नमूद करण्यात आले. या सर्व गोष्टींमुळे वादी म्हणतात त्याप्रमाणे २०१३ साली खरेदीखत होणे शक्य नसून त्यामागे वादीची लबाडी आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

११. या परिस्थीतीमध्ये प्रतिवादीचे पूर्वाधिकारी यांनी जागा विकत घेवून त्या विकसीत केल्या आहेत. त्या अकृषीक करुन त्याच्यामध्ये पेट्रोलपंपाचे बांधकाम केले आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांचे वडील मयत झाल्यावर त्यांनी स्वतः त्यामध्ये इतर सुधारणा करुन हॉटेल दुर्गाप्रसाद नावाचा व्यवसाय देखील सुरु केला आहे. त्याबाबत ही संपूर्ण जाणीव वादी व त्यांचे पूर्वाधिकारी यांना होती असे कथन प्रतिवादी यांनी केले आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांची दुमजली इमारत देखील त्या जागेमध्ये उभी आहे असे कथन त्यांनी केले. थोडक्यात, यातील त्यांच्या ताब्यातील ७ आणे ३ पै ची मिळकत विकसीत केली असून त्याला कुंपण देखील केल्याचे नमूद केले आहे. अशा परिस्थीतीमध्ये रस्त्याच्या पश्चिम दिशेस वादी म्हणतो त्याप्रमाणे कोणतेही क्षेत्र शिल्लक नाही. वादी यांनी पूर्वीच्या दाव्यामध्ये

मोजणीची मागणी केली होती. मात्र त्याचा प्रयत्न असफल झाल्याने त्यांनी गुंडाच्या मार्फत प्रतिवादींच्या मिळकतीस हरकत, अडथळा केला. त्यासाठी खोटे खरेदीखत केले आणि त्यामुळे त्यांच्याविरुध्द फौजदारी खटला देखील दाखल करण्यात आला होता. सबब वादी हे चुकीच्या पध्दतीने बनावट गोष्टींच्या आधारे हक्कस्थापनेची मागणी आणि त्याचसोबत वाटप मागत असून तशी मागणी मागण्याचा त्यांना कोणताही अधिकार नाही असे प्रतिवादी म्हणतात. सबब वादी यांना कोणतीही प्रथमदर्शनी बाजू नाही, न्यायाचा समतोल हा प्रतिवादीच्या बाजूने झुकलेला आहे व मनाई दिल्यास प्रतिवादी यांचे अपरीमित असे नुकसान होईल म्हणून वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

१२. उभय पक्षकारांनी सादर केलेली बाजू, त्याच्या सोबत सादर करण्यात आलेले कागदपत्रे याचा विचार करुन माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित राहतात

अ.क्र.	**मुद्दा**	**निष्कर्ष**
१.	वादी यांनी प्रथमदर्शनी बाजू सादर केली आहे काय ?	नकारार्थी
२.	न्यायाचा समतोल हा मनाई देण्याच्या बाजूने झुकलेला आहे काय ?	नकारार्थी
३.	मनाई नाकारल्यास वादी याचे अपरीमित नुकसान होणार आहे काय ?	नकारार्थी
४.	काय आदेश ?	अर्ज नामंजूर.

कारणमिमांसा

१३. मी वादी व प्रतिवादी यांच्या वकिलांचा सखोल युक्तीवाद ऐकला. त्यांनी सादर केलल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

मुद्दा क्र. १ ते ३

१४. प्रस्तुत अर्जाचे निराकरण करण्याकरीता वादी यांनी दाव्यामध्ये काय कथन केले आहे याचा उहापोह होणे गरजेचे आहे. वादीच्या दाव्यातील वादकथनातून असे दिसून येते की दावा मिळकत ही मूळतः गट नंबर ३७४६ ज्याचे क्षेत्र १ हे. ९९ आर चा भाग आहे. वादी, प्रतिवादी यांनी सादर केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की मूळ गटक्रमांक ३७४६ हा बाबा नाथा मंडले यांच्या मालकीचा होता. दाव्यासोबत वादी यांनी सुरवातीला केवळ गटक्रमांक ३७४६ चा सातबारा सादर केला. त्याठिकाणी महत्वाची गोष्ट म्हणजे वादी यानी दाव्यासोबत आपले खरेदीखत सादर केले नव्हते.

१५. प्रतिवादी ३ ते ६ यांचे पूर्वाधिकारी यांना बाबा नाथा मंडले यांनी १९९१ साली सुमारे ४३ आर चे क्षेत्र विक्री दिले असल्याबाबतचे कथन वादीने केले. मात्र प्रतिवादी यांच्यामते त्यांचे पूर्वाधिकारी यांना १९८१ साली सदर जागेतीची विक्री करण्यात आली होती. या अनुषंगाने नि. ४५ येथील यादीवर अनुक्रमांक ३ येथे सदर खरेदीखताची प्रत सादर करण्यात आली आहे. सदर प्रत छायांकित स्वरुपाची असून त्यातून प्रथमदर्शनी असे दिसून येते की ज्यावेळेस सदर खरेदीखत करण्यात आले तेव्हा प्रतिवादी यांचे पूर्वाधिकारी यांना ३ आणे ६ पै चा हिस्सा देण्यात आला. सदरचे क्षेत्र रस्त्याकडील बाजूने देण्यात आले होते.

१६. या गोष्टीवरुन मुळात वादी म्हणतो त्याप्रमाणे प्रतिवादी ३ ते ५ यांचे पूर्वाधिकारी यांच्या लाभात १९९१ साली खरेदीखत झाले नव्हते तर ते १९८१ साली झाले हाते असे दिसून येते. अशा परिस्थतीमध्ये असे दिसून येते की मूळ गटक्रमांक ३७४७ मध्ये ३ आणे ६ पै म्हणजे सुमारे ४३ आर इतक्या क्षेत्राचे खरेदीखत सर्वप्रथम करण्यात आले. तदनंतर उभय पक्षकारांच्या वादकथनातून असे दिसून येते की आटपाडी भिवघाट रस्त्याबाबतचे संपादन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने असणारा फेरफार क्रमांक ९०८ वादी यांनी नि. ४९ सोबत सादर केला असून रस्त्याबाबत क्षेत्र संपादित केल्याचे त्यावरुन दिसून येते. त्यामध्ये वादी यांचे पूर्वाधिकारी यांच्या नावाचा देखील उल्लेख आहे. तसेच सदर

गटक्रमांक ३७४६ मधील सुमारे १९ आर इतके क्षेत्र संपादित करण्यात आल्याचे दिसून येते.

१७. थोडक्यात, १९८३ सालापर्यंत प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे पूर्वाधिकारी आणि तद्नंतर रस्त्याला देण्यात आलेले क्षेत्र पाहता सुमारे ५९ आर इतक्या क्षेत्राची विल्हेवाट झाली होती असे प्रथमदर्शनी दिसून येते. असे असताना, तदनंतर वादीच्या कथनाप्रमाणे बाबा नाथा मंडले यांनी त्यांच्या १२ आणे ६ पै इतक्या हिश्याची विल्हेवाट विविध लोकांना केली असल्याचे कथन केले आहे. त्याप्रमाणे गटनंबर ३७४६ ब पैकी बाबा नाथा मंडले यांच्या नांवे असलेले संपूर्ण क्षेत्र म्हणजे आणेवारी मध्ये १२ आणे ६ पै इतके गृहीत धरुन त्यांनी रोहिदास वाघमारे, भानुदास बुधावले, शांताबाई माने, शामराव मंडले, उत्तम मंडले यांना प्रत्येकी ६ पै क्षेत्र विक्री केले. त्याचप्रमाणे शंकर मंडले यांना ५ आणे ९ पै व आकुताई मंडले यांना ३ आणे ९ पै असे क्षेत्र १९८३ साली खरेदी दिले. त्याचप्रमाणे पुढे सदर व्यक्तींपैकी आकुताई हिने तिला दिलेल्या ९ पै क्षेत्रापैकी १९ पै क्षेत्र रस्त्याच्या पूर्व भागात म्हणून सुभाष व शिवाजी निकम यांना तर रस्त्याचे पश्चिम बाजूस २ आणे २ पै क्षेत्र पुन्हा बाबा नाथा मंडले यांना १९८४ साली खरेदी दिले. सदर सुभाष व शिवाजी यांचे क्षेत्र आता प्रतिवादी २२, १० ते १४ यांचे नांवे आहे. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे बाबा नाथा मंडले यांना पुन्हा मिळालेली मिळकत म्हणजे २ आणे २ पै ही मिळकत रामराव सातारकर यांना १९८४ साली दिली.

१८. अशा परिस्थीतीमध्ये उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे शंकर मंडले यांना जी काही ५ आणे ९ पै इतकी मिळकत मिळाली होती त्यापैकी १०.५ पै इतके क्षेत्र त्यांनी सातारकर यांच्या हिश्याला लागून दक्षीणेकडे पूर्व पश्चिम चालीने १९९५ साली खरेदी दिले. तद्नंतर पुन्हा शंकर मंडले यांनी सातारकर यांना त्यांच्या उर्वरित हिश्यापैकी पावणेनउ पै इतके क्षेत्र १८.०१.१९८९ रोजी खरेदी दिले. सदर खरेदी दिलेल्या क्षेत्राच्या चतुःसिमेत पूर्वेस भिवघाट रस्ता व दक्षीणेस शंकर मंडले यांचे राहिलेले क्षेत्र असा उल्लेख आहे. तद्नंतर शंकर मंडले यांनी ४. ८.१९८९ रोजी निवृत्ती शिंदे याला २ पै इतके निंबवडे रस्त्याकडील क्षेत्र खरेदी

दिले. अशा परिस्थीतीमुळे शंकर मंडले यांच्या हिश्श्यात दावा जमीनीपैकी रस्त्यास लगत पश्चिमेस असणारे दक्षीण अंगाचे ३ आणे पावणेतीन पै इतके क्षेत्र शिल्लक राहिले.

१९. मात्र याठिकाणी महत्वाची गोष्ट म्हणजे सदर लोकांना जे काही क्षेत्र तबदील करण्यात आले त्यापैकी प्रतिवादींचे पूर्वाधिकारी यांना तबदील करण्यात आलेल्या क्षेत्राच्या खरेदीखताबाबतचा पुरावा प्रतिवादी ३ ते ५ यांनी सादर केला आहे. मात्र वादी यांच्यामार्फत इतर व्यक्तींबाबत जे काही व्यवहार झाले त्याबाबतचा कोणताही कागदापेत्री पुरावा सादर करण्यात आलेला नाही. यामुळे नेमका कोणाला, कसा कब्जा देण्यात आला होता, त्या व्यक्तींनी घेतलेल्या जागेच्या चतुःसिमा कशा होत्या अशा गोष्टी वादीने स्पष्ट केलेल्या नाहीत.

२०. वादीने सादर केलेल्या पुराव्यातून मूळतः असे दिसून येते की एकुण गट क्रमांक ३७४६ याचे मूळ मालक यांनी विविध लोकांना वेळोवेळ त्यातील मिळकत खरेदी दिली आहे. मात्र एकंदरीत विक्री केलेल्या क्षेत्राचा आणि आणेवारीचा हिशोब केला असता वादी म्हणतो त्याप्रमाणे त्याला जितकी जागा आता कब्जात आहे याचा हिशोब लागत नाही. मूळातच वादीने सादर केलेल्या कागदपत्रांतून म्हणजे सातबारानुसार जे काही क्षेत्र विविध लोकांच्या नांवे दर्शविण्यात आले आहे अगदी त्याचा देखील हिशोब केला असता दावा मिळकतीचा मूळ गटक्रमांक ३७४६ च्या एकूण क्षेत्रापेक्षा विक्री करण्यात आलेले क्षेत्र जास्त दिसून येते.

२१. अशा परिस्थीतीमध्ये मूळतः वादी यांनी आपली बाजू स्वतःच्या पायावरती मांडली पाहिजे. परंतु याकामी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांतून असे दिसून येते की नि. ५१ च्या यादीसकट सादर करण्यात आलेल्या दस्ताऐवजामध्ये प्रतिवादी यांनी दावा मिळकत अकृषक करुन घेतल्याचे दिसून येते. सदर आदेश हा १९९१ सालचा असून त्या क्षेत्राला एकंदरीत उत्तर दक्षीण व पूर्वपश्चिम सिमेस सांगली स्टेट हायवे व निंबवडे रस्ता असल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी नि. ४५ सोबत सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये बांधकामाची

परवानगी सादर केलेली आहे.

२२. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांनी नि. ४५ सोबत सादर केलेल्या कागद यादीमध्ये अनुक्रमांक ३ ते ६ येथे विविध साली करण्यात आलेली खरेदीखते सादर करण्यात आली आहेत. त्यापैकी पहिले खरेदीखत हे १९८१ सालाचे असून त्याप्रमाणे त्याचा उहापोह उपरोक्त केलेला आहे. तद्नंतर दि. २३. १२. १९८५ चे खरेदीखताचे अवलोकन केले असता सदर खरेदीखत साडेदहा पै हिश्याचे असून प्रतिवादीचे पूर्वाधिकरी यांच्या हिश्याला लागून दक्षीण बाजूने पूर्वपश्चिम हिस्सा दिल्याचे त्यात नमूद आहे. तदनंतरचे खरेदीखत १८. १. १९८८ चे असून त्यामध्ये चतुःसिमांचा उहापोह केला असता त्यात पूर्वस दिघंची भिवघाट रस्ता असा उल्लेख करण्यात आला आहे. या खरेदीखतातील दक्षीणेकडील बाजूला असणा–या चतुःसिमेमध्ये वादी याचे पूर्वाधिकारी यांची शिल्लक जमीन असा उल्लेख आहे.

२३. मात्र वादी याचे म्हणणे असे आहे की त्यांच्या कब्जामध्ये तीच जमीन आहे. अशा परिस्थीतीमध्ये वादी याने प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादा दरम्यान त्याच्या लाभात करुन दिलले खरेदीखत सादर केलेले आहे. सदर खरेदीखत नि. ६१ वरील यादीसोबत सादर करण्यात आलेले आहे. त्यचा उहापोह केला असता सुमारे ३५ आर क्षेत्र वादी यास विक्रीत करण्यात आले असे तो म्हणतो. मात्र जर का वादी याच्या कथनाप्रमाणे त्याच्या कब्जात असणरे क्षेत्र हे आटपाडी भिवघाट रस्त्याला लागून आहे. वादीच्या मते त्या जागेच्या पलीकडे प्रतिवादी ३ ते ५ यांचा पेट्रोलपंप आहे. परंतु या कामी सादर करण्यात आलेल्या नकाशाचे, वादी याच्या कथनाचे आणि त्याने सादर केलेल्या खरेदीखतातील मजकुराचे अवलोकन केले असता वादी म्हणतो त्याप्रमाणे वस्तुस्थीती दिसून येत नाही. वादीच्या खरेदीखतामध्ये चतुःसिमा आणि त्याने केलेले वादकथन याच्यामध्ये प्रचंड विसंगती आहे. अशा परिस्थीतीमध्ये मुळातच वादी यांचे पूर्वाधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या खरेदीखतांचा, त्याप्रमाणे मूळ गटकमांक ३७४६ मधील शिल्लक राहणा–या क्षेत्राचा आणि आता २०१३ साली वादी यांनी केलेल्या खेरदीखताचा विचार केला असता वादी यांनी आपली बाजू प्रथमदर्शनी दर्शविलेली नाही.

वास्तविकतः वादीची बाजू ही पूर्णता संधीग्ध आणि अस्पष्ट अशी दिसून येते.

२४. उपरोक्त परिस्थीतीमध्ये वादी याला अशाप्रकारे दावा दाखल करण्याचे काय कारण हे दर्शविण्याकरीता प्रतिवादी यांनी वादी यांनी पूर्वी दाखल केलेल्या दाव्याचे कागदपत्रे याकामी सादर केले आहेत. त्यास अनुसरुन नि. ४१ च्या यादीसोबत पूर्वीच्या दाव्याची प्रत व त्या दाव्याची पुरसीस सादर करण्यात आली आहे. तो दावा देखील वाटपासाठी करण्यात आला होता. सदर दाव्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये देखील प्रस्तुत दावा मिळकतीचा मूळ गटक्रमांक समाविष्ट होता. त्यामध्ये दावा मिळकती या वादी यांच्या अविभक्त कुटुंबाच्या मिळकती असल्याचे कथन त्यांनी केले होते. मात्र वादी याच्या प्रस्तुत दाव्यातील वादकथनाप्रमाणे असणारे तथ्य विचारात घेतले असता ज्यावेळी पूर्वीचा दावा दाखल करण्यात आला तो दावा या दाव्यातील वादीनेच दाखल केला होता.

२५. या दाव्यातील वादीचे कथन पहता बाबा नाथा मंडले यांच्याकडून वेळोवेळी गटनंबर ३७४६ मध्ये ज्या काही मिळकती तबदील करण्यात आल्या त्यापैकी ५ आणे ९ पै चा हिस्सा शंकर मंडले यांना १९८४ साली खरेदी देण्यात आला होता. असे जर का असले तर मुळात बाबा मंडले यांचे नांवे तेव्हा कोणतीही मिळकत शिल्लक रहात नव्हती. शंकर याला खरेदी दिलेली मिळकत ही आता प्रस्तुत वादीने खरेदी घेतली आहे असे वादीचे कथन आहे. त्याकरीता त्याने नि. ६१ च्या यादीसोबत खरेदीखत सादर केले असून खरेदी देणार म्हणून दिलीप शंकर मंडले आणि अशोक शंकर मंडले यांचे नांव दर्शविण्यात आले आहे. याकामी वादी याने पूर्वी दाखल केलेल्या दाव्याचे अवलोकन केले असता सदर दाव्यातील वादकथनामध्ये दिलीप आणि अशोक यांना शंकर याची मुले म्हणून दर्शविण्यात आले आहे. थोडक्यात, चुलत भावांनी वादी याच्या हितामध्ये खरेदीखत करुन दिले असे दिसून येते. परंतु शंकर मंडले यांच्या इतर वारसांबाबतच्या अधिकारांचे काय? असा प्रश्न उपस्थित राहतो.

२६. अशा परिस्थीतीमध्ये सर्व परिस्थितीचा विचार केला असता असे दिसून येते की शंकर मंडले यांच्या मुलांमार्फत एक खरेदीखत वादी याच्या हिश्यात

करण्यात आले आहे. मात्र उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे खरेदीखताविषयक जागा आणि वादी दावा मिळकत म्हणून जी जागा दर्शवितो यामध्ये बिलकुल सुसुत्रता दिसून येत नाही. यामुळे प्रतिवादी ३ ते ५ म्हणतात त्याप्रमाणे वादी यांनी पूर्वी दावा दाखल करुन वादीला त्यामध्ये यश आले नाही म्हणून नव्याने प्रस्तुतचा दावा प्रथमदर्शता चुकीच्या तथ्यांवर आधारीत राहून दाखल केले असल्याचे दिसून येते.

२७. प्रतिवादी ३ ते ५ यांनी याकामी नि. ४५ सोबत सादर केलेले छायाचित्र, इतर कागदपत्रे, नि. ६८ सोबत सादर करण्यात आलेल्या अकृषीक परवान्याचा आदेश, नि. ६३ सोबत सदर करण्यात आलेल्या इंडियन ऑईल कार्पोरेशनच्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की प्रतिवादी ३ ते ५ यांच्या कब्जामध्ये भिवघाट रस्त्याच्या पश्चिमेला असणारे क्षेत्र त्यांनी कथन केल्याप्रमाणे कब्जात आहे. याकामी वादीने देखील काही छायाचित्रे नि. २९ सोबत दाखल केली आहेत. मात्र त्याचा कोणताही उपयोग वादी याला करुन घेता येणार नाही.

२८. अशा एकंदरीत परिस्थीतीमध्ये उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे वादी प्रथमदर्शनी बाजू प्रस्तापित करु शकलेला नाही. त्याचप्रमाणे वादीने आपली बाजू स्वतःहून शाबीत करावयाची आहे. मात्र वादी तसे करु शकलेला नाही. याकामी उभय पक्षकारांनी मांडलेली बाजू व सादर केलेल्या प्रथमदर्शनी पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की न्यायाचा समतोल हा मनाई देण्याच्या बाजूने नाही. वादी प्रार्थीत करतो त्याप्रमाणे मनाई दिल्यास प्रतिवादी यांचे अपरीमित नुकसान होणार आहे. मुळातच कोणताही तुर्तातुर्त ताकीद अर्जाचा विचार करीत असताना त्यामध्ये वादींनी प्रथमदर्शनी आपली बाजू आणि आपले अधिकार प्रस्थापित केले पाहिजेत. मात्र तसे झालेले दिसून येत नाही. सबब मी मुद्दा क्र. १ ते ३ चा उल्लेख नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्रमांक ४ साठी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे–

१. वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही...

दि. ३०.१०.२०२१ (वि. द. पाटील)

आटपाडी दिवाणी न्यायाधीश क.स्तर, आटपाडी

.

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - Civil Judge Jr.Dn. Atpadi.
Date - 30.10.2021
Order signed by the
Presiding Officer on - 30.10.2021
Order uploaded on - 31.10.2021